// गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

# (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२२३१०४ E-Mail : gug.registrar@gmail.com

जा.क्र./गोंवीग/कुसका/४८०१ /२०२० दिनांक २८/०४/२०२०

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :— महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६० वा वर्धापन दिन समारंभ — १ मे, २०२० बाबत.**

**संदर्भ** :— १) शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांचे पत्र क्रमांक उशिस/१मे/मवि—१/२०२०/४१०३ दि.२३.०४.२०२०
२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक : सीईआर—२०२०/प्र.क्र.६५/३० दि.१५.०४.२०२०
३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक गोंविग/कुसका/४८५४/२०२० दि.२३.०४.२०२०
४) शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांचे पत्र क्रमांक उशिसं/२०२०/१मे/मवि—१/४१०९ दि.२७.०४.२०२०

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भीय पत्र क्रमांक ३ अन्वये १ मे, २०२० महाराष्ट्र दिन अत्यंत साधेपणाने व मर्यादित स्वरूपात साजरा करण्याबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या होत्या. परंतु शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे संदर्भीय क्रमांक ४ चे पत्र दिनांक २७.०४.२०२० रोजी प्राप्त झाले असून सदर पत्रात नमुद प्रमाणे सामान्य प्रशासन विभागाद्वारे निर्गमीत करण्यात आलेल्या शासन परिपत्रक दिनांक १५.०४.२०२० व दिनांक २२.०४.२०२० अन्वये कोरोना विषाणू संसर्ग टाळण्यासाठी यावर्षी राज्यात १ मे, २०२० महाराष्ट्र दिन हा कार्यक्रम केवळ जिल्हा मुख्यालयातील जिल्हाधिकारी कार्यालये या ठिकाणी अत्यंत साधेपणाने व मर्यादित स्वरूपात ध्वजारोहन करून साजरा करावयाचा आहे. (कृपया अवलोकनार्थ)

करीता आपण आपल्या महाविद्यालयामध्ये १ मे, २०२० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६० वा वर्धापनदिनाचा ध्वजारोहण समारंभ संदर्भीय पत्र क्रमांक ४ अन्वये करण्यात येवू नये, ही विनंती.

संलग्न :— वरीलप्रमाणे.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीकरीता :—**

१. मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्र—कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
Web : www.dhepune.gov.in
E-mail : prash.dhepune@nic.in

फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फोन नं.०२०/२६११११५३

क्रमांक : उशिसं/२०२०/१ मे/मवि-१ /4109 दिनांक २७.०४.२०२०

27 APR 2020

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,

**विषय : दिनांक ०१ मे, २०२० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६० वा वर्धापनदिन समारंभ साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :** १.सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीईआर-२०२०/ प्र.क्र.६५/ ३०, दिनांक १५.०४.२०२०
२.सामान्य प्रशासन विभाग, शासन पत्र क्रमांक सीईआर-२०२०/प्र.क्र.६५/३० दिनांक २२.०४.२०२०

कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी, यावर्षी राज्यात "महाराष्ट्र दिन" हा कार्यक्रम अत्यंत साधेपणाने आयोजित करण्याबाबत संदर्भ क्रमांक १ च्या शासन परिपत्रकान्वये स्वयंस्पष्ट सूचना देण्यांत आलेल्या आहेत. त्यातील निर्देशानुसार राज्यातील केवळ जिल्हा मुख्यालयातील जिल्हाधिकारी कार्यालये या ठिकाणी ध्वजारोहण करण्याबाबत संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे.

संदर्भ क्रमांक १ व २ लक्षात घेता आपल्या विभागातील सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित व मॉडेल डिग्री महाविद्यालये, वसतीगृहे व परिसंस्था तसेच सर्व अकृषि विद्यापीठे / अभिमत विद्यापीठे / स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे या ठिकाणी दिनांक ०१ मे, २०२० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६० वा वर्धापनदिनाचा ध्वजारोहण समारंभ करण्यात येऊ नये, याबाबत सर्व संबंधितांना आपल्यास्तरावरुन सूचित करण्यांत यावे.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे - १



E:\Hemant\Letter 2017.docx

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६० वा
वर्धापन दिन समारंभ - १ मे, २०२०

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : सीईआर-२०२०/प्र.क्र.६५/३०
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख : १५ एप्रिल, २०२०.

**शासन परिपत्रक**

महाराष्ट्र राज्य स्थापनेला दिनांक १ मे, २०२० रोजी ६० वर्षे पूर्ण होत आहेत. कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी, यावर्षी राज्यात " महाराष्ट्र दिन " हा कार्यक्रम अत्यंत साधेपणाने आयोजित करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

१. राज्यातील मंत्रालय व सर्व जिल्हा मुख्यालयातील जिल्हाधिकारी कार्यालये या ठिकाणी एकाच वेळी सकाळी ८.००वा. **फक्त ध्वजारोहण** करण्यात यावे.
२. या ठिकाणी केवळ पालकमंत्री, जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद एवढयाच पदाधिकारी/ अधिकारी यांनी उपस्थित रहावे.
३. इतर मान्यवरांना आमंत्रित करण्यात येवू नये.
४. कवायतीचे आयोजन करण्यात येवू नये.
५. विधीमंडळ,मा.उच्च न्यायालय व इतर संविधानिक कार्यालयांमध्ये कमीत कमी उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात यावे.
६. ध्वजारोहण करणारे पालकमंत्री महोदय काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमस्थळी उपस्थित राहू न शकल्यास, जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी यांनी ध्वजारोहण करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(रा.गो.गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-
मुख्य सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव,
~~सर्व प्रधान सचिव / सर्व सचिव, मंत्रालयीन विभाग,~~
मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

Scanned with CamScanner

## महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०२३१३२.
फॅक्स क्रमांक ०२२-२२८२२६२६.

क्र.सीईआर-२०२०/प्र.क्र.६५ /३०
सामान्य प्रशासन विभाग,
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २२ एप्रिल, २०२०.

प्रति,
जिल्हाधिकारी
भंडारा

विषय : दिनांक १ मे, २०२० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६० वा
वर्धापनदिन समारंभ साजरा करण्याबाबत.
संदर्भ: आपले क्र:अका/संकीर्ण/कावि/३२८/२०२०
दि.२१.०४.२०२०

वरील विषयाबाबत संदर्भाधीन पत्र कृपया पहावे.

२. कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी, यावर्षी राज्यात " महाराष्ट्र दिन " हा कार्यक्रम अत्यंत साधेपणाने आयोजित करण्याबाबत दि.१५ एप्रिल, २०२० च्या शासन परिपत्रकान्वये स्वयंस्पष्ट सूचना देण्यात आलेले आहेत. त्यातील निदेशानुसार राज्यातील केवळ जिल्हा मुख्यालयातील जिल्हाधिकारी कार्यालये या ठिकाणी ध्वजारोहण करावयाचे आहे.

GOVERNMENT OF MAHARASHTRA ★ GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT ★ MUMBAI

(रा.गो.गायकवाड )
अवर सचिव महाराष्ट्र शासन

email